अतितात्काळ : महत्वाचे

क्रमांक : पोमसं/६/आंतरजिल्हा बदल्या-पोशि ते सपोउनि/४०/२०१५, मुंबई, दिनांक : १८.४.२०१५

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३/अधिसूचना/१४/२०१४/७३, दि.२५.२.२०१५.

विषय : पोलीस शिपाई ते स.पो.उ.नि. दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदल्यांबाबत.

********

परिपत्रक :-

संदर्भित विषयासंबंधी हे स्पष्ट करण्यात येत आहे की, **पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षकांच्या दर्जापर्यंतचे पोलीस कर्मचारीवर्ग यांच्या संबंधीत परिक्षेत्र / आयुक्तालय / विशेषीकृत अभिकरण यांचे बाहेरिल बदल्यांकरिता पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ सक्षम प्राधिकारी आहेत. तसेच पोलीस कर्मचारी ते पोलीस निरीक्षकांच्या दर्जापर्यंतचे पोलीस कर्मचारी वर्ग यांच्या संबंधीत परिक्षेत्र / आयुक्तालय / विशेषीकृत अभिकरण यांच्याअंतर्गत बदल्यांसाठी संबंधीत परिक्षेत्र / आयुक्तालय / विशेषीकृत अभिकरण यांच्या स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळे सक्षम प्राधिकारी आहेत.**

या अधिनियमानुसार राज्य पोलीस विभागातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या, त्यांच्या विनंतीवरुन **परिक्षेत्रांतर्गतच्या जिल्ह्या-जिल्ह्यातील आंतरजिल्हा बदल्या करण्यास परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक आणि आयुक्तालय / परिक्षेत्राबाहेरील आंतरजिल्हा बदल्या करण्यास पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई हे सक्षम प्राधिकारी आहेत.**

त्यानुसार राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या विनंतीवरुन **परिक्षेत्रांतर्गतच्या जिल्ह्या-जिल्ह्यातील आंतरजिल्हा बदल्या ह्या संबंधीत परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे स्तरावरुन आणि जिल्ह्यातून आयुक्तालयात तसेच आयुक्तालय / परिक्षेत्राबाहेरील जिल्हा / आयुक्तालयातील आंतरजिल्हा बदल्या ह्या पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचे स्तरावरुन करण्यात येईल.**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्य पोलीस विभागातील घटक कार्यालयाच्या आस्थापनावरील बरेच पोलीस कर्मचारी त्यांच्या कौटुंबिक / वैद्यकिय / अन्य कारणास्तव त्यांच्या मूळ आस्थापनावरुन इच्छित जिल्हा / आयुक्तालयाच्या पोलीस दलात बदली होणेबाबत त्यांचे विनंती अर्ज संबंधीत आस्थापनाप्रमुखांमार्फत सादर न करता थेट या कार्यालयासह अन्य वरिष्ठ कार्यालयास सादर करित असतात. त्यामुळे त्यांच्या विनंतीच्या अनुषंगाने संबंधीत आस्थापनाप्रमुखांची कोणतीही शिफारस या कार्यालयास प्राप्त होत नाही. **त्यामुळे आतापर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेले असे सर्व अर्ज संबंधीत आस्थापनाप्रमुखांकडे पाठविण्यात येत आहे. संबंधीत**

p.t.o.

आस्थापनाप्रमुखांच्या शिफारशी शिवाय परस्पर या कार्यालयास प्राप्त झालेल्या / होणाऱ्या अशा विनंती अर्जावर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. सर्व घटकांनी सदरची बाब त्यांच्या आयुक्तालय / जिल्हा पोलीस पत्रकाद्वारे त्यांच्या आस्थापनावरील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

**करिता सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातून आयुक्तालयात; आयुक्तालयातुन जिल्ह्यात; एका परिक्षेत्रातून दुसऱ्या परिक्षेत्रात; किंवा एका आयुक्तालयातुन दुसऱ्या आयुक्तालयात बदलून जाण्याची इच्छा असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून त्यांचे विनंती अर्ज प्राप्त करुन घेऊन स्पष्ट अभिप्रायासह, तसेच कर्मचाऱ्यांचे संपुर्ण सेवातपशीलासह दि.30.4.2015 पर्यंत न चूकता या कर्यालयास सादर करावेत. दि.30.4.2015 नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.**

(आशुतोष डुम्बरे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई आणि लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)

प्रत माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीकरिता :-
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.

प्रत,
प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पो.म.सं. यांचे कार्यालय, मुंबई.
२. यांनी सदरचे परिपत्रक महाराष्ट्र पोलीस दलाच्या www.mahapolice.gov.in वर Flash-others-PC to ASI Dist. Transfer या संकेतस्थळावर आजच उपलब्ध करावी.